

REFBK-0016304
REFBK-0016304
सव१२८७

ग्रेस

# संध्याकाळच्या कविता

काव्य
अ.नं. ४४०७[illegible]
१५/११[illegible]
९७५२

# नवे कवी
# नवी कविता १

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४४०७४ वि: काव्य
[illegible] ९७५२ नों. दि: १५।११।७९

१

ग्रेस

संध्याकाळच्या कविता

२

ना. धों. महानोर

रानातल्या कविता

# संध्याकाळच्या कविता

ग्रेस

REFBK-0016304
REFBK-0016304

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६३०४

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

© माणिक गोडघाटे

पहिली आवृत्ती : १९६७/१८८९

मुद्रक : वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, गिरगांव, मुंबई ४
प्रकाशक : ग. रा. भटकळ, पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी ताडदेव रोड, मुंबई ३४

to Ingrid Bergman ...

[illegible]

It is not a tragedy that men become old or die but cease from love...

— Somerset Maugham

एखाद्या समृद्ध माणसासारखे
माझ्या वाट्याला आले रामदास भटकळ.
त्यांच्यासंबंधी काय लिहूं ?

मी आज आयुष्यात उभा आहे
आणि त्याचें सर्व श्रेय
लीला गुणवर्धिनी यांचे.

—ग्रेस

दा. क्र. १६३०४

क्षितिज जसें दिसतें,
तशीं म्हणावीं गाणीं
देहावरची त्वचा आंधळी;
छिलून घ्यावी कोणी.

गाय जशी हंबरते,
तसेंच व्याकुळ व्हावें
बुडतां बुडतां सांजप्रवाहीं;
अलगद भरुनी यावें.

## आषाढबन

इथलेंच पाणी,
इथलाच घडा,
मातीमध्यें—
तुटला चुडा.

इथलीच कमळण,
इथलींच टिंबें
पाण्यामध्यें—
फुटलीं बिंबें.

इथलेच उःशाप,
इथलेच शाप,
माझ्यापाशीं—
वितळे पाप.

इथलीच उल्का
आषाढ–बनांत
मावळतीची—
राधा उन्हांत

## रंग

थेंबउणें ऊन
माळावर जळे,
कांचेवर तडे
श्रावणाच्या.

स्तनांवर माझ्या
जांभळाची झाक;
ओली आणभाक
आठवते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

## उखाणा

शुभ्र अस्थींच्या धुक्यांत
खोल दिठींतली वेणा;
निळया आकाश-रेषेंत
जळे भगवी वासना.

पुढें मिटला काळोख—
झाली देऊळ पापणी;
आतां हळूच टाकीन
मऊ सशाचा उखाणा.

## सोन्याच्या मोहरा

गेलें उकरून घर,
नाहीं भिंतींना ओलावा;
भर ओंजळीं चांदणें,
करूं पांचूचा गिलावा.

आण लिंबोणी सावल्या,
नाहीं आढ्याला छप्पर;
वळचणीच्या धारांना
लावूं चंद्राची झालर.

पाय-ओढत्या वाळूची
आण तेव्हांची टोपली;
कधीं खेळेल अंगणीं
तुझी-माझीच सावली?

गेलें उकरून घर
जाऊं धुक्यांत माघारा,
कधीं पुरून ठेवल्या
आणूं सोन्याच्या मोहरा.

## राघववेळ

नभाला धरबंद नाहीं
तळहातावरील वळीव स्पर्शाचा.
उशालगतच्या गंधगार रात्रींत
गुरफटलेलें क्षितिज दूर ढकललेंस
आणि बुडून गेलास...
विमुक्त, तरल, उदविलेल्या, श्यामल
टेकड्यांच्या ढगाळांत.
उरलेल्या स्पर्शाच्या ओळींत सजतांना
थिटीं पडलींत माझ्या प्रारब्धांतील अक्षरें !
अनाहूत अशा विलक्षण विश्वासानें,
तडकलींत माझीं घरकुलें,
शेंदरी देठांचे प्राजक्ती स्मशान
ओंजळींतून गळतांना !
तुझ्याच आघातानें कां टळून जात नाहीं
सुरंगी गात्रांना कुरतडणाऱ्या
राघववेळेचा प्रहर ?

## ओळख

मालविल्या सांज-दिव्यांची
तम-मार्गावरतीं खंत,
वृद्धेच्या ओवींमधला
उरिं दाटुन ये भगवंत.

पानांच्या जाळींमधलें
वाऱ्याचें कुंडल डुलतें,
ओठांची मिथिला ल्याया
पदरांतुन नभ व्याकुळतें.

तुटलेली ओळख विणतां
प्राणांची फुटते वाणी,
पायांतुन माझ्या फिरतो
अवकाश निळा अनवाणी.

## हळवी

जळांत भिजलें
वळण उन्हाचें,
मावळतीच्या सरणावरती
निजून आलें
उरलें सुरलें दुःख मनाचें.

धुक्यांत गढल्या
भित्र्या अगतिक
कौलारांच्या तांबुस ओळी,
मी फिरलें
दारावर झोकुन शिणली मोळी.

झालें हलकें
तमांत पैंजण.
तंग जरासा उसवुन वारा,
भावुक हळवी
धांवत सुटलें मृद्‌बंधांतुन.

## पहांट

आज केशरी थेंबांनीं
जाग आणिली कोवळी.
हाका-हाकांच्या लेण्यांत
सूर घुमले पोवळी.

निळया ओलाव्याच्या कांठीं
आज नारिंगाचें बन,
झाली तरंग....तरंग
स्निग्ध मेघांची पोकळी.

रित्या मुठींत झांकला
शुक्र प्रभेचा अनंत,
स्पर्शास्पर्शांत गोंदलें
स्वप्न राधेचें हिवाळी.

## आकाश

गुंतवितां मिठी
गर्द झाले श्वास,
सुजलें आकाश
पाठीवरी.

अशा रंगापाशीं
मातीचें चांदणें,
पल्याडचें जिणें
जन्माआधीं.

## हिमगंध

नको मोजूं माझ्या
मुक्तीचीं अंतरें ;
ब्रह्मांडाचीं दारें
        बंद झालीं.
माझ्या आसवांना
फुटे हिमगंध,
मागें-पुढें बंध
        पापण्यांचे.

•

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम .................... दि: ....
क्रमांक .................... नों दि: ..

## निर्मिति

कधीं पांघरावे मीहि
        माझ्या रक्ताचे प्रपात,
गूढ घावांचे किनारे
        मींच तोडावे वेगांत.

असा आंधळा आवेग
        मींच टाळावीं बंधनें,
विश्वनिर्मितीच्या रात्रीं
        मला छेदावें श्रद्धेनें.

अशा लाघवी क्षणांना
        माझ्या अहंतेचें टोंक,
शब्द फुटण्याच्या आधीं
        ऊर दुभंगते हांक.

## पाउलें

पलीकडच्या पातळ अंधारांतून
पाहिलेंस मला.
उन्मन होऊन रेषांच्या तसूतसूंत
वितळलें होतें मी....
...शिल्पध्यान...मायकेलेंजेलोचें.
—अचानक निघून गेलास न थांबतांच,
भाद्रपदांतील शेवटच्या लहरी मेघाप्रमाणें
तेव्हांपासून सांभाळीत आलें आहें,
कस्तुरीच्या मातीवर उमटलेलीं
राजहंसाचीं पाउलें.
नंतरचे आशीर्वाद प्रस्तरांत पुरलेस
वाचतां येऊं नये म्हणून मलाच माझ्या
नियतीची भाषा....संज्ञाहीन.
तरीहि जातात कधींकधीं
माझ्याच मनाच्या कांठाकांठानें,
स्मरणाच्या मुक्तीचा ऊद जाळीत
अबोल रानाला साद घालणाऱ्या
सुतार पक्ष्याचे पडसाद.

## पार्श्वभूमि

भुरभुरत्या संधिप्रकाशांत भिजलेलें
कार्तिकांतील धुकें
डोळ्यांच्या बाहुल्यांना चिकटलेले
मायेचे क्षण.
सरकणाऱ्या क्षितिजावर ओळख
हरवून बसलेली छायावेळ.
अथांगपणांत बुडालेलें माझें
स्वप्नगंध.
एक हलकासा तरंग घेऊन मीहि
ढवळून काढावा आसमंत....
हीं शिखरें मोडावींत....
हीं झाडें सारावींत....
—हा पूल जोडावा....
आणि नसलेल्या सुरूंच्या झाडांना
द्यावी एखाद्या प्राचीन शिल्पाची
पार्श्वभूमि.

## पांढरे हत्ती

पांढऱ्या शुभ्र हत्तींचा
रानांतुन कळप निघाला
संपूर्ण गर्द शोकाच्या
झाडांतहि मिसळून गेला.

त्या गूढ उतरत्या मशिदी
पक्ष्यांनी गजबजलेल्या
कल्लोळ पिसांचा उडता
आभाळ लपेटुन बुडल्या.

पांढऱ्या शुभ्र हत्तींनी
मग डोंगर उचलुन धरले
अन् तसें काळजाखालीं
अस्थींचें झुंबर फुटलें.

मावळता रंग पिसाटे
भयभीत उधळलीं हरिणें
मुद्रेवर अटळ कुणाच्या
अश्रूंत उतरलीं किरणें.

पांढरे शुभ्र हत्ती मग
अंधारबनांतुन गेले
ते जिथे थांबले होते
ते वृक्ष पांढरे झाले.

## कांच

डोळ्यांतुन रंगित सांज
परतली आज
भटकल्या गायी....
व्याकूळ अनावर
धूळ पसरली बाई.

खिडकीला टेकुनि पाठ
कशी वहिवाट
बावरे न्यारी
अंगात रुते कीं कांच
तुझ्या दुखणारी.

ओलेच उदविले केस
तुझ्या स्मरणास
दिसे पडशाळा
बगळ्यांची झुलती
मंद फुलांची माळा.

झाडांत संपती दूर
मंदिरें चूर
बिलगती जैसीं
घर तुला खुणावे
तूंच अशी वनवासी.

डोळ्यांत गुंफुनी थेंब
जराशी थांब;
देह राख हलणारा
हिमकंपित इथला
भणभण फिरतो वारा....

## माहेर

चांफ्याच्या झाडापाशीं
अंधार जसा गांधार निनादत येतो
माहेर निळें कोणाचें....
चोळींत दुधाचा थेंब जसा तळमळतो.

माहेर तुला नसतांना
ओटींत तुझ्या मी कसा भरावा वारा
दुःखाचा जन्म घरा ये
आभाळ सोडतां घुंगुर बनतो तारा....

वैराण दिशांचा जोग
चांदणें नदीच्या पाण्यावर निजलेलें
तव हात उडोनी जाती
जे ओल फुटाया तूंच स्तनांवर धरले....

शिल्पान्त खंड स्मरणाचा
निःसंग जोडिशी क्षितिज कशाला भगवें
हें जरी मिटे प्राणानें
सान्तांतुन अवघें अस्त घेऊनी उगवे....

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........ दि: ........
क्रमांक ........ नोंद दि: ........

## लाटांचें देऊळ

लाटांचें देऊळ असावें
जिथे नसाव्या लाटा
समुद्र सोडुन दूर निघाल्या
जळवंतीच्या वाटा....

माडांनाही वाट नसावी
फक्त असावे डोळे
या देहाच्या दिप्तींमधला
चंद्र जिथें मावळे....

सागरतंद्रींतून नसावें
कुठें चुळाभर पाणी
तुझ्या कृपेच्या दुःखामागें
येइन मी अनवाणी....

## भगवंत

ही चंद्र-उदयिनी वेळा
घननीळ कांठ मेघांचे
भरतीच्या क्षितिजावरुनी
घर दूर जसें सजणाचें....

तूं उभी अधोमुख येथें
निद्रेचा उधळुन जोग
गर्भांत धरित्रीच्याही
ये जशी फुलांना जाग....

वहरांत दुःख अनवाणी
कीं पैलथडीची रात....
माझाच स्पर्श सर्पाचा
अमृतमय माझे हात....

अंधार कडे घेऊन
हें कोण रडाया आलें ?
दृष्टींत अरण्यामधलें
मातीचें चंदन ओलें....

तरि तुझ्या कुशीचा रंग
शरिरावर माझ्या उमटे
कीं चिंब अभंगामधला
भगवंत स्मृतीवर दाटे....

## निर्मळा

प्रतिबिंब गळे कीं पाणी
अपुल्याच दिठीशीं हंसलें
ओसाड प्राण देवांचे
सनईंत धुक्याच्या भिजले....

स्वररेघ निर्मळा पसरे
रडतात तमाशीं झाडें
कीं श्रावण घेऊन हृदयीं
ओवींत उतरलें खेडें....

हिमभारी अपुले डोळे
पृथ्वीच्या थोर मुळाशीं
पायांवर येउन पडती
मरणाच्या हिरव्या राशी....

वासांत विराणी कसली ?
पाण्याचे तंतू तुटती
लोचनें जशी स्पर्शानें
खाचेंतुन गळुनी पडती....

ही अशी निर्मळे रात
अज्ञात आठवे चेहरा....
अन् हात तुझा क्षितिजाशीं
ती वाट उभी धरणारा....

## पाऊस

पाऊस कधींचा पडतो
झाडांचीं हलती पानें
हलकेच जाग मज आली
दुःखाच्या मंद सुरानें.

डोळ्यांत उतरलें पाणी
पाण्यावर डोळे फिरती
रक्ताचा उडला पारा....
या नितळ उतरणीवरती.

पेटून कशी उजळेना
ही शुभ्र फुलांची ज्वाला
ताऱ्यांच्या प्रहरापाशी
पाऊस असा कोसळला.

संदिग्ध घरांच्या ओळी
आकाश ढवळतो वारा
माझ्याच किनाऱ्यावरती
लाटांचा आज पहारा.

## डोळे

एक सांज अशी
तिचा रंग जरा लाल
माझ्या कपाळाला
तुझ्या धुळीचा गुलाल

....एक रात्र अशी
तुझे सीतेपरी डोळे
रूप पाहतांना
नभीं अंधार पाजळे....

## श्रावण

हा श्रावण गळतो दूर
नदीला पूर
तरूवर पक्षी
घन ओलें त्यांतुन
चंद्र दिव्यांची नक्षी....

हा श्रावण वाजवि धून
निळें अस्मान
स्तनांवर गळलें
मन सगुण फुलांच्या
मंद क्षितीजीं जडलें....

हा श्रावण रडतो दूर
तमाला सूर
मघाची वाट
झाडांचीं चरणें
त्यांवर एक ललाट....

## जन्म

ऊन वेचतां मनांत
स्पर्श लाघवी जळे,
सांज-रंग पांघरून
गगन जन्मलें निळें.

स्तब्ध मी उभी तुझ्यांत
ढळत गहनता अशी;
वळत वळत पावलांत
वाट गुंतली पिशी.

वृक्ष-ओल दूर....दूर;
तरल बावरे जिणें;
चांदण्यांत लोचनें नि
लोचनांत चांदणें.

चांदणी उबेंत पंख,
झोपलींत पांखरें;
शब्द...शब्द जळत देह,
मुक्त गान मोहरे.

रिक्त या कवेंत मी नि
शून्य ध्यान एकलें;
रात्र घेउनी उशास
क्षितिज गाढ झोपलें

## वर्षाव

उन्हें उतरलीं
एक सावली
पुढें दिठीवर थेंब नवा
या वळणाशीं
दुःख उराशीं
सूर वितळतो जणुं भगवा.

स्वप्नें अपुलीं
कुणी सजविलीं ?
रंग तिरावर व्याकुळसा
नाद उगाळुन
सांज-बनांतुन
कळप गुरांचा निघे जसा.

माझ्या वक्षीं
निजती पक्षी
अतुल सुखाची ही धारा
देह अनावर
निज मातीवर
हिम वर्षावत ये वारा....

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ४४०७८ दि:
क्रमांक १८५२ नोंद दि

## वैरी

वाऱ्यानें हलतें रान
तुझें सुनसान
हृदय गहिवरलें
गायीचे डोळे करुण उभे की
सांज निळाईंतले....

डोळ्यांत शीण
हातांत वीण
देहांत फुलांच्या वेगी
अंधार चुकावा म्हणुन
निघे बैरागी....

वाळूंत पाय
सजतेस काय ?
लाटांध समुद्राकांठीं
चरणांत हरवला गंध
तुझ्या कीं ओठीं....

शून्यांत गर्गरे झाड
तशी ओढाळ
दिव्यांची नगरी
वक्षांत तिथीचा चांद
तुझा कीं वैरी ?

## इराणी संगीताच्या प्रतिमा

आपोआप हलतात इथल्या वाळूवर इराणी
संगीताच्या प्रतिमा....
मला आलिंगनांत मरण तसा रात्रीचा शृंगार,
तुझें चांदरातीचें अर्थनिळें मन....
कुठें याच्याही पलीकडे, कुठे त्याच्याही पलीकडे संपूर्ण
अवकाशाला टाळून फक्त वाऱ्यालाच ऐकूं येईल
अशी सारंगीची पिपासा
जशा इराणी संगीताच्या प्रतिमा....
वाळू पसरली देहापार, कुणाच्या नादांत?
कुणाच्या शोधांत?
स्वरसिद्ध तिचे अनंत कण; रेषाबद्ध उंटांच्या
मानेंत जसें चंद्रबन....
कुणी दिसत नाही; नाही दिसत एवढ्या प्रचंड
टापूंत मला, कुण्या युगांत येथें झाडें उगवलीं
असतील त्या डोळयांचा निरंगी नश्वर सुरमा
जशा इराणी संगीताच्या प्रतिमा....
मज्जेच्याखालीं तळमळणारे फुलांचे दैवी घोस....
कीं कुण्या वैदेहीची पंथविराम गुणगुण?
शिशिराच्या मागें वाजवी सूत्रधाराची धून....
नभ एवढें विराट, माझें नाही तसें तुझेंही नाही या
वाळूच्या सप्तरंगी कणांचें अज्ञातपण
फक्त दुःखाच्या देखाव्यांना दिशाबद्ध
करणारें पिरॅमिडांचें अधांतर;
जशा इराणी संगीताच्या प्रतिमा....

## अर्थ

वाळूचीं घरकुलें मोडलेल्या शापांचें शैशव ;
विस्मयाच्या उत्कंठेचें वरदान घेऊन
उभें असतें तुझ्या डोळ्यांच्या
किनाऱ्यावर.
दुथडी भरून वाहत असतें तुझें मातीचें घर
कसल्याशा आवेशाच्या उन्मेषपूर्ण
उल्हासांत.
काठाकाठानें चालावें तरीही पाय भिजतात....
विखुरलेल्या शब्दांचे अर्थ मी गोळा करून
आणले असतात....

## संग

अंगोअंगीं पाजळले
केशरांचे दिवे
अंधारांत दिसे गांव
तृष्णेकांठीं नवें.

पाय-मेंदीपाशीं गेले
चांदण्यांचें बळ
कुठें कुठें दुखूं लागे
कस्तुरीची कळ.

देह ओवूं जाता जडे
अंबराचा मणी
अजाणाचा संग माझा
पांडुरंग धनी.

# चुडा

तुला पाहिलें मी नदीच्या किनारीं
तुझे केस पाठीवरी मोकळे
इथें दाट छायांतुनी रंग गळतात
या वृक्षमाळेंतले सावळे

तुझीं पावलें गे धुक्याच्या महालांत
ना वाजलीं ना कधीं नादलीं
निळागर्द भासे नभाचा किनारा
न माझी मला अन् तुला सावली....

धराया विनाशास संदर्भ माझे
जशा संगीतानें दिशा पेटल्या
तुझ्या सांद्र ओढाळ देहांत तुजला
नदीच्या कळा कोणत्या भेटल्या.

मनावेगळी लाट व्यापे मनाला
जसा डोंगरी चंद्र हा मावळे
पुढें कां उभी तूं तुझें दुःख झरतें
जसे संचिताचे ऋतू कोवळे...

अशी ओल जातां तुझ्या स्पंदनांतून
आकांत माझ्या उरीं केवढा !
तमांतूनही मंद ताऱ्याप्रमाणें
दिसे कीं तुझ्या बिल्वरांचा चुडा....

## कलश

सांज-घनांच्या मिटल्या ओळी
मिटले माझे नयन निळे
शिरिष फुलांच्या शय्येवरतीं
क्षितिजावरचें रान जळे

तळ्यांची ही फुटकी ओंजळ
जोग असा का हा विटका ?
उंच उडाली धूळ म्हणोनी
क्षणांत झालों मी बुटका...

दुःखाचें बन उधळित सुटला
मातीवरचा घन वारा
घरांत माझ्या ओघळल्या मग
अधरविणेच्या मधुधारा

इथें बांधिलें घरकुल कोणी
अंधाराला भ्रांत पडे
तीरावरच्या रेतीपाशीं
समुद्र हळवा आज रडे.

प्राक्तन ओढुन निजल्या गायी
प्राण तुझे मग हंबरले
इथें दिठीवर उमले पाणी
कलश दुधाचे कुणीं भरले ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........................ दि: ..........
क्रमांक ........................ नोंद दि ..........

## दु:ख घराला आलें

अंधार असा घनभारी
चंद्रांतुन चंद्र बुडाले
स्मरणाचा उत्सव जागुन
जणुं दु:ख घराला आलें.

दाराशीं मी बसलेला
दु:खावर डोळे पसरुन
क्षितिज जसें धरणीला
श्वासांनी धरतें उचलुन . . .

विश्रब्ध किनारे दूर
जाऊन कुठें मिळताती
जणुं हृदयामागुन माझ्या
झाडांचीं पानें गळती . . . .

नाहींच कुणी अपुलें रे
प्राणांवर नभ धरणारें
दिक्काल धुक्याच्या वेळीं
हृदयाला स्पंदविणारें . . . .

## कावळ्यांचा रंग

कुणी आपुलें म्हणेना
कुणी बिलगेना गळां
कंठ दाटतांना झाला
रंग कावळ्यांचा काळा.

नसांनसांतून वाहे
फणा उगारून साप.
दूर सावल्यांचा घोळ
माझें नाचवितो पाप.

रात्र आंधळ्या कौलांची
कुणी आढ्याला बांधली
चंद्र पडला मरून
इथें पहाडाच्या खालीं.

## निनाद

तुझी भीति वाटावी तसें पारिजाताचें झाड
निनादानें फुलें सोडून जाणारें.
मनाच्या भिंतीआडून कुणीतरी गाणारें
जवळ येऊ नये म्हणून रात्रीचा प्रपंच...
झोपाळ्यावर झोके घ्यावे म्हणजे
नीजही येऊं लागते
पण मोडत नाही बुबुळांच्या शुभ्रतेंत
रुतलेला चंद्र....

## तहान

कुठल्याही क्षणीं यावेसें वाटतें.
हुतात्म्याच्या समाधीवरील फुलांसारखे
मंद मधुर दिवस...
मृत्यूच्या पार्श्वभूमीवर गळणारें तुझें लावण्य
कुठल्याही क्षणीं प्यावेंसें वाटतें....

## प्रारंभ

इंद्रियांच्या प्रारंभांत क्षितिज,
संवादीपणानें.
नाद माझे हळुवार, पैंजणी रात्रींना
दु:ख अभिजात, स्पर्शमय वर्तुळांत
क्षणाक्षणानें.
अवकाश-रेषा निसरड्या, सप्तरंगी
आकाशगामी डोळियांच्या गुंफांत....
जाऊं नकोस, हांकेवर थांब, ते अमृताचे
भयाण डोह आहेत
अमर होशील....

## दुपारचें ऊन....

दुपारचें सचित्र ऊन मृगजळांस लांबवी
अनंत इंद्रियांतले स्वतंत्र शोक जागवी....
जिथें उभारलीं घरें तिथें अपार शून्यता
दुपारच्या उन्हांतली विचित्र एकसंधता....
समुद्र आटतील का ? अतर्क्य सूर्य वाहतो
अशी अवेळ साधुनी मनांत कोण हिंडतो....
तहान ही मला गिळे नि कंठ हो तुझा निळा
उन्हांत पाय वाजती कुणांत जीव गुंतला....

## बहार

पान पान सोडती सहिष्णु वृक्ष येथले
चक्र ओंजळीतलेंच वर्तुळांत नादलें
ऐकतों कुठेंतरी तमांत झांकलीं घरें
दिशादिशांत गात हा फकीर एकटा फिरे
पहाड शब्द वेढती तसा सतंद्र गारवा
नि रक्तवाहिन्यांतुनी उडे सुसाट पारवा....
तुझी बहार मंदशी तृषार्त जाग ये जरी
वेदनेंतलीं फुलें नि चांदण्यांतल्या सरी....
तुझेंच अंग चंदनांत अंतराळ ओढते
पुरांत आणखी असें सजून ओल मागतें....
दुःख लागतां मला सभोंवतीं जसेंजसें
दयार्द्र होउनी तसें क्षितीज दृष्टिला दिसे....

## दुपार

विवर्त नभ एकटें सतत तापलेली हवा
उन्हांत जणुं मैथिली तुजसि शोधिते राघवा....
विवस्त्र मृगतंद्रिनें क्षितिज वाहतें कीं पुढें
तृषार्त बिलगे मला सभय चातकांचा थवा.

तुझे तटचि पांगळे तरिहि विश्व यावें गळीं
सुवर्णवन पेटलें तुझिं न आसवें मोकळीं....
प्रशांत नगरांत या घरचि सांपडे ना मला
जिथें अधर गोंदिला पिळुनी वासनेचा दिवा.

विराण नुपुरापरी नभचि तीक्ष्ण झालें निळें
उन्हांत जणुं दीप्तिचें फुटुनि सांडतें की तळें
विदग्ध प्रतिमेपरी सगुण ऊन झेलूं नको
तुझें अमल दुःख दे मजसि तेवढा जोगवा....

## नदीच्या कांठीं

नदीच्या कांठानें दिवस मळला सांज ढळली
जशी वृक्षांना ये शिशिर-भिजली हांक पिवळी
कुणाचे हे देवा अशुभ हिरवे सूर उडती
तुझ्या रक्ताखालीं किति‌क सजलें चंद्र ढळती.

नदीच्या कांठानें मरण-मिटलीं मंद चरणें
जशी झाडांखालीं हळुच गळती चंद्रकिरणें
नदीच्या पाण्यानें हृदय करुणा नेत्र भरलें
जसे प्रारब्धाच्या कुशित थकुनी शब्द निजले....

—पुढें स्वप्नांधांच्या धुळिंत कसला गंध मिसळे
जशी गांधारीचीं नदिंत गळती नेत्रकमळें
नदीच्या तीरांना क्षितिज अपुले प्राण भिडवे
दिशांना मेघांचे मधुन जडती रंग भगवे....

## भेट

जियें थांबावें तूं तिथुन झरते सांद्र करुणा
कुणाच्या श्वासांची नितळ पडली भूल सजणा
इथें दुःखाचा हा बहर पिकला सांज गहिरा
तुझ्या केसांचा कीं धुळिंत पडला खिन्न गजरा....

मला झाडांपाशी कुणि न दिसले शिल्पभरले
निळ्या वस्त्रांच्या कीं कुशिंत सजुनी अंग हरलें
जुन्या तृष्णेनें ही सहज ढळती मुक्त शिखरें
कुणाला सांगावें बहर इथला दूर बहरे....

उभीं रानें त्यांचा विकल विहगें ताल धरिती
जशीं नक्षत्रांचीं फिकट किरणें दूर हलती
तुझ्या डोळ्यांचा मी सदय गिळला अश्रु पहिला
तरी माझ्या देहीं कुठुनि तव हा देह उरला....

जळा सोडी मासा म्हणुनि तुकया संत बनतो
कुठें कल्पान्ताला प्रलय-भरला कंठ फुटतो
पुन्हा भेटीसाठीं सघन तम ये आज जवळी
फुलें सर्वांगाचीं टपटप गळावीं सगळीं....

## संयोगिनी

विराट घुमटांतुनी गळत सावल्यांचीं घरें
उजाड शिशिरांतलीं गहन सावळीं मंदिरें
हिमांत जडली कुठें तरल स्वप्नभूमी निळी
तसेच घन मंद हे, हृदयिं लागलेले झरे....

तुझ्यांत नभवाहिनी कुठुन रक्त गंधावलें
अनाथ तुटल्या तिरीं विझत सूर्य कीं मावळे
शरीर विणलें कुणी अतुट फाटली वासना
तुझ्यांत भिनल्यावरी फिरुन चंद्र अर्धा उरे....

पहाड इथले मुके दिवस आंधळा कीं जसा
अभंग तिमिरांतला तडत चालला आरसा
तसा सहज नाचतों कधिं न बांधिलीं पैंजणें
जशा धुळिंतल्या दिशा भुलुन गाय जी हंबरे....

## हळदीचे हात

रंगाच्या रसनेंत सूर्य बुडाला अंधारलें सागरीं
बेटांचें जळबिंब फक्त हलतें माझ्याच प्राणांवरी
घोड्यांचे पथ दक्षिणेंत मिटले गेले सखेसोबती
एकाकी नभ प्राक्तनांत शिरतां रक्तांत येते भिती....

अशेयाहुन गूढ गूढ दिसती झाडांतलीं वर्तुळें
तूं पाठीवर रंग आज विणले कीं द्राक्ष-वेलींतले
यात्रेच्या अपुऱ्या अभंगसमयीं पाठींत कैशा विजा
अश्रूही सरल्यावरी उमलसी तूं एकटी स्वप्नजा....

माझ्यानें उठवे न दार उघडे वारा मला आवळे
लाटांच्या ध्वनिबंधनांत अडलें चैतन्य कीं आंधळें....
अस्थींचीं उडती पिसें सजुनिया अंधार घाली कडें
हळ्दीचे कुणि हात हे पसरले माझ्या सुखाच्या पुढें....

माडांच्या परिघांत मी विझविल्या स्वप्नार्त चंद्रावळी
डोळयांचीं बुबुळें तुझीं उलटता झाली धरित्री निळी....
तृष्णेच्या पहिल्या फुलास गिळतो माकंद ओठांतला
कर्णाच्या घनतेंत कीं वितळतो संभोग कुंतींतला....

## मरण

अंधारांतुन जात कुणीतरी गात पुढें क्षितिजाला
मातीमधला पाऊस घेऊन सुगंध इथवर आला.

सुन्न निरामय चिरनिद्रेपरि नभ माथ्यावर गढलें.
प्रारब्धांतिल विश्व कुणाचें जसें तमावर निजलें....

अंधारांतुन सरकत जाती झाडांचे जड पुतळे
कुणीं मांडिले ? कशास माझे लोचन भरुनी आले....

ध्वनिबंधावर तूंच उभी कीं युगें निळावत गेलीं
आभासांतिल हिमशिखरांची रांगच घसरत आली...

उभे धराया मला पुरांतुन सूर समाधी ल्याले
हृदयांमधलें अमृत प्याया मरण कोठवर आलें....

## नाद

वाकल्या दिशा फुलून स्निग्ध रंग सावळा
या फुलांत या सुरांत चंद्र घालतो गळा
पावलें अशीं सलील नादती कुठून नाद ?
मी क्षितीज वाहतों तरी जुळे न शब्द, गीत.
दु:ख एक पांगळें जशी तरूंत सावली
या उरांत पेटलीस, कां उन्हास काहिली ?
असें कसें सुनें सुनें मला उदास वाटतें
जशीं उडून पांखरें नभांत चाललीं कुठें.

## मूल

प्रकाश गळतो हळू हळू की चंद्र जसा उगवे
पाण्यावरती उमटत जाती अंधुक अंधुक दिवे....
दूर सनातन वृक्षांना ये हिरवट गंध मुका
दु:ख-सुरांचा क्षितिजांपाशी मेघ दिसे परका....
हिमनगरांतिल बर्फ-धुळींचे उत्सव भरले नवे
धुक्यांत तुटल्या शिखरांवरती पक्ष्यांचेहि थवे....
मंदिर-मंदिर पाणी....पाणी शिल्प कुठें वितळे
दु:खाच्या तंद्रींतुन जैसें अमृत ठिबकत निळें....
माझ्या हातुन मुठभर माती अवकाशावर पडे
घरांघरांना मरणफुलांची गंधित भूल जडे....

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम ४४०७४ दि: [illegible]
क्रमांक ९७५२ नोंद दि ९५[illegible]

## गाणें

सांज हंबरे पिशी तुझीं धुळींत पैंजणें
धुळीस पाय लागतां धुळींत गोंदलें जिणें.
गोंदणें कसें निनाद कोरल्या धुक्यांवरी
कलंडल्या दिशा तमांत वांसरें उभीं घरीं....
तुझ्या मिठींत मी ढळें तशींच वांसरें मला
वनांत गाय शोधतां कसा सुगंध लागला....
सुदीर्घ दूर सावल्या तसें क्षितीज भासलें
कुण्या फुलांस पांघरूं तरूंस मेघ लागले....
सशिल्प दु:ख मंदिरीं धुळींत रेखतां तुला
उभ्या निजेंत जागणें दिसे न गांव आपुला.

## शाप

संधिप्रकाशांतिल रेषेवर स्तब्ध थांबलीं गुरें
घाटापासुन घाट तुटे की अरण्य हृदयी भरे....
गांवगांव रस्त्यांत ढळे अन् तशा तन्मयी वाटा
एकाकी प्राणांच्या उठती लाटांवरती लाटा....
या दुःखाचा कलश सावरे तुझ्या कटीची आण
कीं हातानें हळु स्पर्शावि मीच आपुले प्राण....
उभ्या घनांच्या शिखरांमध्ये तुटे जशी चांदणी
मळवट-भरल्या केसांवरचें फूल तसें साजणी
संध्याकाळीं मुका उभा मी मला सतीचा शाप
कुठें पाहतो ? अस्थींवरती सरसर चढती साप....

## वाराणसी

कथेंत निजल्यापरी चढत रात्र आली कशी
सकंप शरिरांतली प्रहरवेल कीं स्निग्धशी
तुझ्या हृदयशक्तिची मिठिंत मृण्मयी धूळ ही
तमांत शिरल्यावरी दुरुन हाक येते जशी....
उदास मन येइना थकुनि झोपलेले झरे
अनाम असल्यापरी तुजसि जन्म गेला स्मरे....
किती तरल सूक्ष्म ही तम-समर्पणाची तऱ्हा
नदींत बुडली जणूं लहर चांदण्यांची अशी....
तमास कुणीही नसे मरण अमृताचें जसें
तशांत तुज स्वप्निंचें अटळ लागलेलें पिसें
सजून मन भाविनी दिसशी हंसगीतापरी
विराट तननिर्मळा बघत आर्त वाराणसी....

## सावली

समुद्र-जळ फोडतां तुटुन लाट ये जांभळी
तिच्या अमित बिंदुच्या कितिक बांधिल्या ओंजळी
उभे पिउन शिल्प हे ढळत नेत्र माझे पुढें
उदास वर माड, तूं खिळुन झावळ्यांच्या तळीं....

मला मरण येउं दे फिटत जाउं दे वर्तुळें
जशा मिटत पापण्या फुलत आसवांचे मळे
उभा अढळ मुक्तिचा प्रलयगंध प्राणांवरी
तुझे चरण मेंदिचे गगन जान्हवीच्या जळीं....

असा कधिं न पाहिला प्रहर भव्य स्पर्शांतला
जसा मिठिंत वांकला सजल मेघ स्वातींतला
उभी व्यथित मग्न ही अचल पर्वतांची सभा
तुझी स्मरुन नग्नता क्षितिज पांघरे सावली....

## प्रार्थना....

या इथें, झाडांना उदासीन करणाऱ्या संधिप्रकाशांत
मी जेव्हां ईश्वरी करुणांचीं स्तोत्रें म्हणूं लागतों
मावळतीला, शेवटच्या किरणांची फुलें समुद्राच्या
दिशाहीन पाण्यांत बुडून जातात...कुठें जातात?
क्षितिजाच्या अमूर्त बनांत पारिजाताचे वणवे
उत्कर्षानें पेटूं लागतात....

या इथें, शिल्प-गांधाराच्या शून्य नगरींत
मी जेव्हां अंतिम वासनांच्या प्रार्थना म्हणूं लागतों,
आत्मलीन पाचोळ्याच्या साक्षीनें;
—तेव्हां तुझ्या लोचनांतील अतर्क्य दु:खांतून,
चंद्रकालीन शिवालयांचीं बर्फाच्छादित शिखरें
प्रार्थनांच्या अंधारांत शिरत असतात.

## साजण

तुझा आला गे साजण
नको त्याच्यापुढें जाऊं
त्यानें यात्रत भेटल्या
कोण्या पोरीच्या देहाला
दिले आभाळाचे बाहू....

त्याला हात नाहीं वेडे
उभा अंधारीं साजण
तिनें जीव दिला तरी
यानें वाहत्या पाण्याचे
इथें आणिले पैंजण....

## विश्व गळतां

विश्व गळतां या तिराला वृक्ष झाल्या बाभळी
श्रावणांतिल वासनांची गर्द प्रतिमा जांभळी.

चंदनाचा धूप जळतो देह झालीं मंदिरें
अर्थ प्राशुन शब्द माझा आज तुजला आवळी.

पाय सोडुन तूं मिटावीं या जळाचीं कंपनें
दूर क्षितिजाला जडावी ही तुझी काया गव्हाळी.

श्वास शिंपुन उत्सवाला चाललीं ही लोचनें
मी पुढें अन् त्या पुढें तूं अमृताच्या राउळीं.

## संभ्रम

ग्रीक पुराणांतील एकांतवासी श्रद्धांसारखी,
मस्तकाच्या धुळींत रथाचीं चाकें रुतलीं आहेत.
शिशिरांतील विझत्या वाऱ्याच्या प्रतिमा,
अंतःकरणावर धूर उजळत आहेत; भूतकाळाच्या
तंद्रींत विसावलेल्या एखाद्या प्राचीन शहरासारख्या....
शेवटच्या बहरांत पारिजाताला यावींत
अर्धनग्न संभाराचीं कांहीं फुलें...तसेंच एखादें
झाड डुलतां-डुलतां करुणेच्या दिगंतपार लयींत
विलीन व्हावें! माझ्या हातांना तळवे नाहींत आणि
तुझ्या पायांना वाटा नाहीत...
क्षितिजाच्या कडेकडेनें उगवणारा एकेक तारा
अंधाराच्या संभ्रमांत गळून पडतो; वैकुंठाच्या
दाराशीं निजलेल्या कैवल्यपूर्ण अस्तित्वांच्या
रांगाच जशा...

## शिलालेख

विराट उग्र गंधांनीं माखलेले
फुलांचे जंगली प्रदेश.
सुगंधानें निर्गुण झालेला जिथून
उतरतो शेवटचा संधिप्रकाश....
धुक्यानें विसरलेल्या दिशांत; क्षितिजाच्या
एका अतूट दिशेला विश्व-मंदाराचीं झाडें....
बकुळीसारख्या सूक्ष्म नक्षींचा मेणा;
माझ्यांतील अंधाराला कापीत जातो आहे,
जेथे बांधिले आहेत ईश्वरानें माझ्या
सर्वांगांचे स्पर्श-काहूर शिलालेख.

## शिल्प

फुलें मावळून गेलीं आहेत
जसे सूर्य मावळतात....
मरणगंधांतून वाहणारीं सतारीच्या
चाकाचीं देवळें....
आणि या विलक्षण नादाचा एक प्रारंभ,
एक युग, जशी चांदण्यांत सरकणारीं
स्तनांच्या कोटींतील शिल्पें....
डोळे भरून वाहणारा काळोख, जसे
सूर्य मावळतात.
पुढें, पुढें हलूं लागतात पाऱ्याच्या
अर्कांतील बदामी डोळे आणि मीच
सामावूं लागतों माझ्या
मनांतील अंधारांत, खोल वितळणाऱ्या
गुहेसारखा....

दा. क्र. १६३०७

## हांक

धुकें अतुट दाटलें नसुन आसवांचा लळा
उरीं फुटुन पेटते गहन गारव्याची झळा
दिशा धरुन वांकले सगुण वृक्ष दुःखांतले
दिसे इथुन दूरचा क्षितिज-दीप मंदावला.
नदी वळत चालली व्यथित पावलांच्या परी
कधीं मधुन उष्णशी लहर उन्मळे बावरी
नको नयन पाजळूं सजल हांक देऊं नको
मला प्रहर लागला ढळुनि चंद्र मेघांतला.
कुठें कळस ठेवुं मी, हळद-वेंचलीं हीं उन्हें ?
पडे दगड आडवा अधिक आंधळीं लोचनें
अशा भरुन ओंजळी कुठुन सांडती हीं फुलें ?
घुमे मरणगंध हा हृदयपूर्ण देहांतला !

## छंद्

निर्वाण पिणारी रात
नदीचे घाट
पुरातन झिजले
वटवृक्ष भूमिची
कूस घेउनी निजले.

पायांत अडकले पाय
जशी की माय
गर्भगांधारी
रोखिला कुणीं गे
छंद असा लयकारी.

फाटतो तिळानें पाश
घनिल आकाश
तुला वरकरणी
मातीची घागर
फुटतां जैसें पाणी....

## स्वप्न

शापच आहे मला संगमरवरांत स्वप्न
लपवून ठेवण्याचा.
पांडुरंगाच्या चरणाला प्रक्षाळण करणारी
चंद्रभागा मी पाहिली नाहीं, आत्मसंवादाची
हीच प्रचीति आली माऊलीच्या उरावर
पाय ठेवतांना.
शापच आहे मला संगमरवरांत स्वप्न
लपवून ठेवण्याचा.
प्राणांचें मोल देऊन मुक्ति विकत घेत
असतों मी; देहूच्या बाजारांत अभंग
विकणाऱ्या तुकारामाप्रमाणें–शापच आहे
मला संगमरवरांत स्वप्न लपवून ठेवण्याचा.
चाहुलवेड्या वाटुलीच्या प्रतीक्षेंत चरणगंधाच्या
स्मृतीचें फूल उमलतांना पाहिलें नाहीं मी,
वाचली नाहीं सांद्र तमगारांत काजव्यानें
रचलेली प्रकाशगाथा; पण फुटलेल्या
डोळ्यांच्या नीरांजनांत तुला ओवाळणारी शिळा
पाहिली आहे रे....
शापच आहे मला संगमरवरांत स्वप्न
लपवून ठेवण्याचा.

## आठवण

या व्याकुळ संध्यासमयीं
शब्दांचा जीव वितळतो
डोळ्यांत कुणाच्या क्षितिजें....
मी अपुले हात उजळतों.

तूं आठवणींतुन माझ्या
कधिं रंगित वाट पसरशी
अंधार-व्रताची समई
कधिं असते माझ्यापाशीं....

पदराला बांधुन स्वप्नें
तूं एकट संध्यासमयीं
तुकयाच्या हातांमधला
मी अभंग उचलुन घेईं...

तूं मला कुशीला घ्यावें
अंधार हळू ढवळावा....
संन्यस्त सुखाच्या कांठीं
वळिवाचा पाऊस यावा....

## चांदणें

दिशांनी मला आज रंगांध केलें
कुण्या मंद तंद्रींत रे साजणा
फिरे हात मेघांवरी सारखा अन्
तुटे शुभ्र संवेदनेचा कणा...

निळ्या अंतराळांतुनी खोल येतात
संज्ञेंत वाळूंतलीं अक्षरें
जशीं दूरचा खंड सोडून आलीं
इथें दाट शोकांतलीं पाखरें....

कुशीला फुटाव्या कधीं चंद्रवेली
पुढें पृथ्विबिंबांतले आरसे
तुझ्या स्पर्शगांधार शैलींतलें शिल्प
स्वप्नांत माझ्या हंसावें जसें....

पायांतल्या शुष्क पानांतुनी
जीर्ण पारावरी शब्द एकांतले
घरें बांधण्याला कुठें झाड नाही
तसे पक्षि सोडूनिया चालले....

घुमावी मुकी हांक यावी पुन्हा
भव्य घुमटांत अंधारलीं स्पंदनें
तुटे एक तारा तसा अस्त माझा
सुखाला तुझ्या ने कुठें चांदणें....

## गांव

आभाळ जिथें घन गर्जे
तें गांव मनाशीं निजलें
अंधार भिजे धारांनी
घर एक शिवेवर पडलें....

अन् पाणवठ्याच्या पाशीं
खचलेला एकट वाडा
मोकाट कुणाचा तेथें
कधिं हिंडत असतो घोडा....

झाडांतुन दाट वडाच्या
कावळा कधींतरि उडतो
पारावर पडला साधू
हलकेच कुशीवर वळतो....

गावांतिल लोक शहाणे
कौलांवर जीव पसरती
पाऊस परतण्याआधीं
क्षितिजेंच धुळीनें मळती....

## अंगाईपण

[library stamp] ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २२०६४ दि: ३१०२५
क्रमांक २५५२१ नोंद दिः २५/११/६०

मी अशांत सावलीनें चालणारा
भावसंमोहन जळत आहे माझें
मावळतीच्या निवान्त क्षितिजावर....
दुःखाचें अभिजात शिल्प उभारशील का
पारदर्शक मरणांत....

सायंकाळ येते तुझ्या उदास
दुःखासारखी
दोन देहांचा एक आकार घेऊन आपण
चालूं लागतों....भयाण इमारतींच्या
भावगर्भांत....

उगीचच वाटत असते तुलाहि आणि मलाहि,
पाय ठेवूं तेवढी भूमि घसरून पडेल....
तरीहि वाट हात जोडून उभी असते.
हवी असते वाऱ्यालाहि इतक्यांत अंगाई
म्हणून मांडतों मीही; कमळांच्या पानांवर
टिंबांचा खेळ....
तुला निजविण्यासाठीं सांगितलेली एक कथा....

## इन्ग्रिड बर्गमन्

आषाढांतील भर्जरी मेघांसारखे पूर्ण ऐहिक डोळे
घेऊन तूं आलीस; नेस्तनाबूत झालेल्या या
साथीच्या गांवांत.
विश्वरचनेंतील बर्फाचा शुभ्र पहाडी अहंकार
या गांवांत आणून सोडलेला....
जशा अनेक बावी किंवा अरण्यांतील निर्मनुष्यतेच्या
पारावर पडलेलीं हजारों फुलें...
हजारों फुलें तशीं हजारों घरें या अनामिकांच्या प्रदेशांत
तुझा घोडा तूं मोकळा सोडलास
शिशिराच्या निर्विघ्न कुरणांत....
तो मध्येच दिपून पाहतो, एका नसलेल्या ध्रुवाच्या
दिशेंत झिजणाऱ्या तुझ्या देहास.
तुला वाटतात तितके सोपे नसतात तुझे अश्रू
पाण्याच्या सलील संभ्रमांत हलतात जखमी
खिस्ताच्या घंटा रात्रंदिवस....
गांवावर सांचलेल्या बर्फांतून अज्ञात निनादांची
महापर्वणी जाऊं लागते.
तसें माझ्या झोळींत कांही नाही; जाण्यायेण्याच्या
चित्रलिपित झाडांचा एखादा संगमरवरी सांगाडा,
तोही चांदण्यांनी शोषून घेतलेला....
फक्त एवढेंच : निःशब्द भासांच्या कांठाला लटकलेलें
हें स्टेशन आणि संवेदनांच्या आवर्तांना झुगारून
कोण्या मावळत्या संताला तूं दिलेलें
एकाकी आलिंगन.

## माणूस

घरांनीं आपलीं दारें बंद केलेलीं असतात,
डोळ्यांना वेढून बसलेल्या अस्तित्वांच्या
रांगाही निवून जातात.

वैराण आणि एकाकी आकाशाच्या
पार्श्वभूमीवर संथपणानें हा जात असतो....
त्याच्या चेहऱ्यावर कदाचित् कमळांचीं
सरोवरें उगवलीं असतील....

परंतु इतक्या लांबून तीं दिसत नाहींत.
त्याच्या पावलागणिक माझ्या गीतांचीं
शकलें होऊन रस्तोरस्तीं सुरांचीं

कारंजीं उडतात, आणि तुझ्या-माझ्यापासून
निघालेला हा दुःखाचा काळोख, केवळ
त्याच्या निसटत्या स्पर्शानेंहि पैंजणासारखा
रुणझुणत वाहूं लागतो....

## घर

दुरून दिसतात अदृश्य सीमेसारख्या
टेकड्यांच्या ओळी.
क्षितिजाच्या सहवासामुळें त्यांचाहि
रंग निळाच भासतो.
मधोमध लांबच लांब मैदान पसरलें
आहे, मोकळें.
दक्षिणेकडील टोंकावर बंगल्यांची आरास,
तिथून जरासें दूर, पायवाटेला,
चर्चमधील सायंघंटेच्या अंतरावर
तुझें घर उभें आहे ;
मालकंसाच्या अवरोहांत उतरणाऱ्या
गांधारासारखें....
तुझ्या मुद्रेवरील संवेदनांच्या उदास
ओळी माझ्यापर्यंत येऊं लागतात,
तेव्हां डोळयांतील बाहुल्यांच्या ज्योतींसाठीं
मीहि क्षणभर स्थिरावतों
मावळता दिवस आणि सावल्यांचे प्रदेश
सांधणाऱ्या संधिप्रकाशासारखा....

## घोडे

मेणबत्तीच्या एकाकी प्रकाशांत तुटलेलीं
ॲनी फ्रँकच्या डायरींतील अक्षरें.
मरणाशीं समांतर आकाश कीं पुरांत
बुडालेलें कॉन्व्हेंट
घोडे येतात तेव्हां आवाज नाहीं,
जातात तेव्हां साज नाहीं
आतां ग्रंथसंभाराचें घर, कांहीं दिशा शून्य
कांहीं सामान्य. मध्यरात्रींचा अंधार,
मधें एखादी आठवण, तसा वारा.
इन्ग्रिड बर्गमनचा पुतळा सर्व पाहतो आहे
माझें उरलेलें आयुष्य....
घोडे येतात तेव्हां आवाज नाहीं,
जातात तेव्हां साज नाहीं.
प्रदीर्घ आजारानंतर कुठल्याशा प्रदेशांतून तूं येतेस
वाटेंत संगमरवरें तुटलेलीं, फुलें गळालीं, झाडें
अभागी झालीं.
माझ्या संमतीशिवाय कोण टाकून जातो झोळींत
त्यांना दिलासा देणारें दुःख
प्रारब्धवादी हिंवाळ्याच्या अंतराळांतून घोडे येतात तेव्हां
साज नाहीं, जातात तेव्हां आवाज नाहीं.

## वाट

तूं येशील म्हणून मी वाट पाहतों आहे
तीही अशा कातरवेळीं,
उदाच्या नादलहरीसारख्या
संधिप्रकाशांत....

माझीं सर्व कंपनें इवल्याशा ओंजळींत
जमा होतात.
अशा वेळीं वाटेकडे पाहणें,
सर्व आयुष्य पाठीशीं बांधून एका सूक्ष्म
लकेरींत तरंगत जाणें;
जसें काळोखांतहि ऐकूं यावें दूरच्या
झऱ्याचें वाहणें....
मी पाहतों झाडांकडे, पहाडांकडे,
तूं येशील म्हणून अज्ञाताच्या पारावरती
एक नसलेली पणती लावून देतों....

आणि आई नसलेल्या पोरासारखे हे माझे
शहाणे डोळे, हलकेच सोडून देतों
नदीच्या प्रवाहांत....

## वार्ता

झाडांच्या अंगऱ्याकुळ डोहांतील वार्ता.
वार्ता माझ्या पापाची.
जसें माझ्या आयुष्यांतून उठून गेलें
कुण्या मुग्ध मायाळू देहाचें मरण....
ऊर्मिले, माझ्यापुरतें आणि ईश्वरासाठीं तुझें हंसगीत.
उध्वस्त फुलांच्या परागांतून यावेत
सोनेरी पावसाचे
अनोळखी संदेश....
जसे जीविताच्या व्यामोहांत समुद्र आणि
त्याचें दीर्घदु:खी पाणी.
डोळ्यांच्या पाताळांत चंद्रदु:खानें पसरावें
काजळ; तशी ही सायंकाळ.
सांपडत नाहीं मन माझें, उभ्या शरीराला
साद घालीत अंधार पुढे येतो आहे
जशी पाण्यावर तरंगणारीं नि:शब्द
एकाकी कमळें...

## चिमणी

मावळत्या संधिप्रकाशांत मी शून्यपणें
बसून आहें.
मागचें आणि पलीकडचें मला
कांहीच दिसत नाहीं,
शेवटच्या कांही क्षणांसारखे स्मृतीचे
दिवे अंधुक झाले आहेत.
उंदरांनी कुरतडलेल्या कवितांचे कागद
माझ्या उशाखाली आहेत.
माझी एकच इच्छा आहे आतां;
तुझ्या विटलेल्या पदराच्या ओबडधोबड
धाग्यांनीं एक चित्र विणावें
आणि रंगीत तावदानांच्या कांचांना फोडून
येणाऱ्या चिमणीच्या धक्क्यानें, गर्द शाईचा
निळा सागर त्यावर कलंडून जावा....

## ऊर्मिला

त्या दाट लांब केसांचा
वाऱ्यावर उडतो साज
दु:खांत अंबरें झुलती
कीं अंग झाकते लाज....

तरि हळू हळू येते ही
संध्येची चाहुल देवा
लांबती उदासिन क्षितिजें
पाण्यांत थांबल्या नावा....

देहास आठवे स्पर्श
तूं दिला कोणत्या प्रहरीं
कीं धुकें दाटलें होतें
या दग्ध पुरातन शहरीं....

सुख असें कळींतुन फुलतें
व्यापतो वृक्ष आभाळ
छायाच कशा दिसती मग
आपुल्यापरी खडकाळ

आटलें सरोवर जेथें
का मोर लागतो नाचूं ?
तूं सोड ऊर्मिले आतां
डोळ्यांत बांधिला राघू....

## देखणा कबीर

दिशावेगळ्या नभाची
गेली तुटून कमान
तुझ्या व्रतस्थ दुःखाचें
तरी सरे ना ईमान !

जन्म संपले तळाशीं
आणि पुसल्या मी खुणा
तरी वाटांच्या नशिबीं
तुझ्या पायांच्या यातना

भोळ्या प्रतिज्ञा शब्दांच्या
गेली अर्थालाहि चीर
कांचावेगळ्या पाऱ्यांत
तरी देखणा कबीर ! !

## फूल

हिममंद कणांचा खांब
जसें प्रतिबिंब
जडावें नयनीं,
मेघांवरचा रंग मालवुन
दूर निघाले कोणी....

दूर निघाले कोणी, अवघें—
—दुःखच नेत्रीं जडलें
अंबर वरती विरलें
सांज-विसरल्या रात्रींपाशी
प्राणच मदिरा प्याले....

प्राणच मदिरा प्याले, नुरला—
दूर नदीचा पूल
भूलच सगळी भूल
धुळिंत हरवला चंद्र कुणाचा
धूळच झाली फूल....

## आसवांत पापणी

सावल्या विसावल्या नि
विश्वतेज मावळे
आरतींत नादतील
सजल सांध्य देउळें

सांद्र रंग, सूर संथ
क्षितिज स्फुंदतें अबोल
मूक वर्तुळांत शब्द—
शून्य हा विराट गोल!

गगन हें कुठें सरे नि
रंग हा कसा निळा
दूर पाहतो उदास
संथ भास एकला

मी इथें व्यथालयांत
दुःख सांगतों तुला
घे मला कुशींत आज
पावलांत शृंखला!

संपणार ना कधींहि
रात्र घोर पापिणी
ओंजळींत हीं फुलें नि
आंसवांत पापणी!

## स्मृतिगंध

तूं उदास मी उदास मेघही उदासले
स्मृतींतले विदग्ध नाद पैंजणांत सांडले

तुझ्या तनूंत चंद्रशिल्प सांजलीं निळीं जळें
जसा समुद्र आंधळा नि सूर्य दूर मावळे....

मंद मंद वाहते दिव्यांतली अनंतता
तुझ्या सुखांस गंधवीत लोचनीं निजे कथा....

अंगणांत ये सजून मृत्यु रोज एकला
पावसाळिं ये जसा नदीस पूर सावळा....

कुठें धुक्यांत चाललीस गर्दलें नभावरी
विश्वमंदल्या दिठींत रात्र थांबली जरी....

## रंगास्त

कलंडत्या सूर्याचीं रंगदर्शनें नाहींत
समुद्र नाहींत आणि लाटांचे
आवाजहि नाहींत.
नारायणीचा विदेही मृत्यू :
त्या रात्रीं झाडांना सोडून जाणाऱ्या
अविनाशी फुलांची झड....
झडीच्या विलापांत थडीला
लागलेलीं शिवालयें ....
कित्येक वर्षांपूर्वींच्या श्रावणानें तिच्या
गळ्यांत गोंदलेल्या तुलसी रामायणाच्या
प्रतिमा....
दृष्टीला अतीव कारुण्यानें आंधळें
करणारें धुकें पसरत असावें
गाभाऱ्यांत....
अशा दिशा हरवतात आणि अशा
दिशा उगवतात.
मनाचे सर्व आभास, दुखाच्या एवढ्या
समर्थ वैभवांतही असतात
पराधीन, पोरके आणि सर्वस्वी
अनाथ.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ४४०७४ वि: काव्य
क्रमांक १०५२ नों. दि: १५/११/५८

## सांज

सांज घराला आली
विश्वाची हलवित काया
मांडीवर मी निजलेला
वर तुझी उदासिन माया.

सांज घराला आली
रत्नांचीं गळती नगरें
कौलांवर चढतिल आतां
घनदाट तमाचीं शिखरें.

सांज घराला आली
चरणांची जुळवित वेल
तूं दीप उजळिले जेव्हां
प्राणांत उगवलें फूल....

सांज घराला आली
कुरणांतुन फिरल्या गायी
नक्षत्र मिसळलें पाणी
कंठांतच गोठुन जाई....

## वार्ड नं. ६ : आर्थोपिडिक्स

गीता रॉयच्या आवाजांतील चाकूचें रेशमी
झळझळतें पातें ;
असंख्य हाकांच्या आर्तपणाचें अंतःकरणावर
भुरभुरणारें जावळ
या विझत्या डोळ्यासमोर प्रतिबिंबांना
तोलून धरणारी केरळी नर्स
तिच्या डोळ्यांत एका क्षणांत दिसतात
कन्याकुमारीच्या रंगीत सूर्याचे उदयास्त....
आमच्या उजव्या पायाचीं दोन हाडें
मोडलीं आहेत.

निव्वळ शारीरिक दुःखाच्या अप्रतिम कळा
दुष्मनांच्या वाट्याला जाऊं नयेत
म्हणून आम्ही घेतल्या
द्यावेंसें वाटतें या यातनांच्या वैकुंठांत
केरळीं माडांना आलिंगन
कळांचा सर्वस्पर्शी ऑर्केस्ट्रा मेंदूच्या कांचेवर
इन्ग्रिड बर्गमनची आसवांत वाहणारी
प्रतिमा रचून जातो ;
उजव्या पायाचीं दोन हाडें मोडलीं आहेत आणि
खोलीच्या दाराशीं बावीस सप्टेंबरच्या विसराळू
संध्येचें बोट धरून केरळी नर्स
तिच्या स्तनांचें मीनाक्षी मंदिर रक्तांतून
चकाकणारें....
रा ऽ ऽ म ऽ–ऽ–ऽ राम–ऽ–ऽ

यह वही दर है जहां आबरू नही जाती....
घोड्यांचा प्रचंड कळप अंधारावर धावून
गेला....
तशा सरकल्या सर्व इमारती.
असा पाऊस कधीं पडला नव्हता....
दुःखवादी तुझी अभिजात आठवण अंगावर ओव्हरकोट
घालून स्मशानाकडे जाणारी....

## प्रिस्टस्

तुझ्या पायांतून खेडींच्या खेडीं ओस पडावी
तसे हे प्रिस्टस्
एका संध्याकाळी बाहेर जमले पठारावर
मोकळ्या आकाशांत एखादा तारा उगवेल
म्हणून पाहण्यासाठीं.
ह्यांच्या डोळ्यांना नाहीत खांचा कीं
कुठल्याही पाण्याचे अज्ञात तळ....
घरटें चुकलेल्या पाखरासारखे उन्मळून
येतात वेळीं अवेळीं.
ह्यांच्या शरीराच्या छिद्रांतून
आरपार शिरत असतात घटांचे
खिस्तव्याकुळ नाद.
तेव्हां चपापून पाहूं लागतात हे, चौफेर,
महाशून्यांत....
कुठें दिसतें का म्हणून देवानें घडविलेलें
एखादें हृदय, कर्मानें बांधलेलें एखादें घर,
नाहीतर रक्तमांसाच्या संभोगाला उगवणारें
शिल्पउदास व्याकुळतेचें एखादें फूल....

१

डोळ्यांमधला एक आरसा स्पर्शुनि घे आकाश
मंद जांभळ्या तारेवरती झंकृत हो अवकाश.
सागरवेळा सांज-मठांची सनई ऐकुन घेती
मुक्या तिरावर पाण्यामधली रंगित पडते रेती....
दृष्टीपासुन सजूं लागती मावळतीचीं किरणें
दु:ख आपुल्या मिठींत हंसतें जशीं उन्हांचीं वळणें.
झाडांवरचा मोहर गळतो देह उधळला गेला
स्मरणयुगांच्या पुढें राहिली दु:खसावळी मिथिला.
उरीं भरावी किती सघनता जळांत गळती तारे
कुठून येती इतके हलके तरंग भरले वारे....

२

या हातानें स्तन गोंदुन घे लाव मंदिरीं दिवा
फूल होउनी अंधाराचे गळुन पडे काजवा....
तूं मरणावर मग रेखावें प्राक्तनगंधी मोती
कीं डोहांवर किणकिणते गे शतजन्मांची भीती....
असुन तुझा मी तुझी दूरता....तुला झाकितो काल
सांग ऊर्मिले, कुणी बांधिले नयनीं चंद्रमहाल?
रंग उदा की उभा उदासिन महामेघ क्षितिजांत
पायाखालीं वाळवंट मग उगवत ये निमिषांत....
लाव मंदिरीं दिवा परंतु सोड स्तनांची माया
मरणावांचुन आज सजविली मीच आपुली काया....

१

एका अमरत्वाच्या संथपणानें ओघळणारा बर्फाचा पाऊस
चिरनिद्रेंतील माझ्या प्राक्तनाचे रंग बांधणारा बर्फाचा
पाऊस. व्योमव्याकुळ अंधारातुन भुरभुरणारा बर्फाचा
नाद ; गात्रागात्रांच्या हांकेवर जमलेले बर्फ-शिल्पाचे
मंद अविनाशी स्तूप....
अंधाराच्या प्राणगहन सुगंधावर कोसळणारी बर्फाच्या
थडग्यांची आरास. त्वचेच्या मेण्यांतून उतरणाऱ्या
चरणांवर वितळणारीं हिमवर्ण शिशिराचीं फुलें....
तुझ्या कुशींतील अक्षम्य स्तनांवरून वाहणारे
चंद्र-वाऱ्यांतील बर्फाचे पराग....
बर्फाच्या मरणकालीन समाधीवरून उजळणारे
शब्दभांगाराचें दीप ; जशी माझ्या इंद्रियांच्या पार
वसलेली अर्थसगुणाची नगरी....
अंधाराच्या नशिबांतून सरकणारी बर्फ-उत्सवाची
यात्रा, जसे तुझ्या पाठीवर ओळीने रचलेले
प्रकाशाचे मणी....

२

वाऱ्यालाही जागा मिळूं नये अशी बंद खोली.
बाहेर हिमाचीं वादळें घोंगावूं लागलीं आहेत.
माझ्या रक्तांतील हाडांचें पाणी होऊन मस्तकाच्या
दिशेनें वाहतें, असें हें दुःखाचें प्रगाढ चिंतन किंवा

अंधाराच्या पृष्ठभागावर उमटणाऱ्या बर्फाच्या सकंप रेषा
डोळ्यांच्या मागील अंधारांतून येणारें हें वादळ;
एखाद्या महायात्रेसारखें झाडांना झोंबू पाहतें,
जसें या निषिद्ध रात्रीं माझ्या दाराशीं कोणी
टांगा घेऊन आलें आहे....
वारा येऊंच शकणार नाही या खोलीच्या बंद दाराशीं.
पायाखालची फरशी किती थंडगार! जसें मीच बसून
असावें माझ्या प्रेताशीं....या बेवारशी डोळ्यांना
असेंच सोडून जावें या पुस्तकांच्या सांगातीं; तसें यांचें
पुढें कोण आहे? मी जसा बर्फांतून आलों तसाच
बर्फांतून जाईन; रात्रीच्या शेवटच्या प्रहरांतील
रहदारीसारखा.

३

दाराच्या एका विदग्ध फेरींत मी अडकलों.
मावळत्या सूर्याच्या उदासीन किरणांत वितळणाऱ्या
कुंतीच्या अपरंपार श्वासांसारखी माझ्या पाठीशीं
येऊन उभी राहिलीस.

बाहेर बर्फाचा पाऊस पडतो आहे. रक्तांतून जाणारे
अश्रू आणि शिशिरांतील अनिकेत पांखरें तुझ्या
अस्थींना बिलगतात; मेघांच्या संधिप्रकाशांतील डोळे
आणि पर्वतांच्या कांठाशीं थांबलेली रक्तवर्ण
सायंकाळ....

बर्फाचा पाऊस पडतो आहे; जशी नियतीच्या शब्दांतून
गळणारी अर्थाची धूळ....मंत्रांनी भारलेल्या या
खोलीच्या दिशा आणि पाण्याच्या तळांत निजलेले
घाटांचे ध्वनी.

अंधाराच्या साह्यानें मी जातों आहे; स्मरणांतून
उमलणाऱ्या आठवणींसारखा. बर्फाचा पाऊस
पडतो आहे; जसें माझेंच दु:ख सचित्र झालेलें....
या कोसळत्या दीपमाळेला टेकून तूं तसेंच उभें

असावेंस, निदान चंद्रमासांतील स्तनांचीं
फुलें होईस्तों....

## अनुक्रमानुसार शीर्षकें आणि तारखा-स्थळें

**आषाढबन**

आषाढबन – २३·१·५८
रंग – १८·१·५८
उखाणा – १९·१·५८
सोन्याचा मोहरा – २०·१·५८
राघववेळ – २३·२·५८
ओळख – २८·१·५८
हळवी – १४·४·५८
पहांट – १·२·५८
आकाश – १३·६·५८
हिमगंध – २१·३·५८
निर्मिति – १४·६·५८
पाउलें – १८·५·५८
पार्श्वभूमि – १३·४·५९

**चंद्रधून**

पांढरे हत्ती – ७·९·६४
कांच – २३·५·६४
माहेर – ५·८·६५
लाटांचें देऊळ – १२·१२·६४ मुंबई
भगवंत – ४·३·६४
निर्मळा – ४·८·६५
पाऊस – १८·७·५९
डोळे – २३·८·५९
श्रावण – २५·८·६२
जन्म – २३·८·५८
वर्षाव – १३·२·६०
वैरी – १०·६·६४
इराणी संगीताच्या प्रतिमा – १६·५·६४
अर्थ – १४·९·५८ पुणें
संग – २१·७·६२
चुडा – ११·४·६५ मुंबई
कलश – २३·८·६०
दु:ख घराला आलें – २४·११·६१
कावळ्यांचा रंग – २९·१०·५९ कालाडी (केरळ)
निनाद – २०·८·५८

**मरणगंध**

तहान – १८·८·५८
प्रारंभ – २०·४·५८
दुपारचें ऊन – १९·१०·६२
बहार – ६·८·६५
दुपार – १२·८·६५
नदीच्या कांठीं – ११·८·६२
भेट – २८·५·६४
संयोगिनी – १५·६·६२
हळदीचे हात – ६·३·६४
मरण – १४·३·६२

RBFBK-0016304
RBFBK-0016304
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. १६३०४
संद. शाखा (कथक ग्रंथ)

नाद – १२·१·६१
भूल – ३·१·६२
गाणें – २९·५·६२
शाप – २६·१·६३
वाराणसी – १३·८·६५
सावली – १६·७·६२
प्रार्थना – २०·१२·६३ अंजनी चर्चयार्ड
साजण – २९·८·६५
विश्व गळतां – ४·८·६१
संभ्रम – २३·१०·६३ अंजनी चर्चयार्ड
शिलालेख – २३·१०·६१ उटकमंड
शिल्प – २६·८·६०
हांक – २७·८·५८
छंद – २८·१०·५९ कालाडी (केरळ)

स्म र ण शि ल्प

स्वप्न २९·४·५९
आठवण – २०·८·६२
चांदणें – २६·७·६४
गांव – ३०·१·६३
अंगाईपण – २७·८·५९
इन्ग्रिड बर्गमन – १५·८·६४
माणूस – १७·८·५९

घर – १४·३·६२ अंजनी चर्चयार्ड
घोडे – १३·८·६५ अंजनी चर्चयार्ड
वाट – २६·८·६४
वार्ता – २८·११·६५
चिमणी – १३·४·६०
ऊर्मिला – २९·७·६४
देखणा कबीर – २७·१०·५९ कालाडी (केरळ)
फूल – ११·९·६४
आसवांत पापणी – २९·५·५८
स्मृतिगंध – १२·७·६१
रंगास्त – १·११·६५
सांज – २९·८·६५
सांज – १३·४·६२
वार्ड नं. ६ : आर्थोपिडिक्स् – २२·९·६५ वार्ड नं. ६ मेडिकल कॉलेज, नागपूर
प्रिस्टस – ९·९·६४ अंजनी चर्चयार्ड

ऊर्मिलेच्या कविता – ७·८·६२

बर्फाच्या कविता – १०·१० ६१ उटकमंड

---

स्थळाचा उल्लेख न केलेल्या कविता नागपूरच्या समजाव्यात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ४४०८४ .... दि: ....
क्रमांक ....१७५२.... नों. दि. ....



'संध्याकाळच्या कवितां'त अनंत संध्यावेळा एकवटल्या आहेत. सगळ्या वेळांची मिळूनच झाली आहे एक दीर्घ संध्याकाळ. प्रकाशाचा मृत्यु होत असताना सृष्टीवर दाटून आलेले गहन आणि गहिरे औदासिन्य, दूर दूर पसरत गेलेली जडता, स्तब्धता आणि निःशब्द एकटेपण, या एकाकीपणात जाणवणारे, चिरंतन सोबत करणारे गूढ पण उदात्त दुःख आणि अशा दुःखातच पटणारी त्या अद्भुत शक्तीच्या अस्तित्वाची ओळख. त्या अद्भुत शक्तीचे अवतरण संध्याकाळी साऱ्या सृष्टीमध्ये होते आणि अशाच वेळी ग्रेसचा आत्मा जागा होऊन गाऊ लागतो. तिथे बाहेर आणि इथे आत एक विलक्षण समाधी–अवस्था निर्माण होते. बाहेरची उदास गूढ चित्रे आतमधला अर्थ खेचून घेतात—एका उत्कट, अधीर प्रतीक्षेचाच भाग बनतात. संध्याकाळच्या धूसर वातावरणात ग्रेसचे दुःख फिरून फिरून जन्म घेते. संध्याकाळीच ही वेदना पुनः पुन्हा जागी होते, कारण याच वेळी–फक्त याच वेळी आत्मा एकटा एकटा होतो–याच वेळी तो स्वतःतून वाहणाऱ्या प्रवाहाच्या उगमापर्यंत जाऊ शकतो. प्रत्येक अनुभूतीतून, प्रत्येक आठवणीतून, अस्तित्वाच्या प्रत्येक कणाकणातून तिथे पोचण्याची तळमळ एक आर्त परंतु मूक हाक मारते ती फक्त संध्याकाळीच. म्हणूनच या संध्याकाळच्या कविता.

'या इथे, झाडांना उदासीन करणाऱ्या संधिप्रकाशात
मी जेव्हा ईश्वरी करुणांची स्तोत्रे म्हणू लागतो
मावळतीला, शेवटच्या किरणांची फुले समुद्राच्या
दिशाहीन पाण्यात बुडून जातात......कुठे जातात ?'

—ग्रेस

किंमत तीन रुपये